**<u>रे.मु.नं.१०२/२०१४ मधील अर्ज (नि.५३) वरील</u>**
**<u>आदेश</u>**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरुस्ती करणेकरिता, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ नुसार दुरुस्ती करणेकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जासंबंधी कथन पुढीलप्रमाणे आहे.

प्रतिवादी याने दावा मिळकतीचे दक्षिण बाजूस वादीने बांधलेले दगडी वॉल कंपाउंड असलेल्या बांधकामास अडोसा करुन अंदाजे ५ बाय ५ इतके लांबी रुंदीचे कुडामेडयाचे व त्यावर छप्पर टाकून तात्पुरत्या स्वरुपाचे झोपडे तयार केलेले आहेत व त्या झोपडयालगत प्रस्तुत बांधकाम कायम स्वरुपी करणेकरीता लागणारे साहित्य विटा व पाण्याची टाकी यांची जमवाजमव केली आहे. त्याकरिता दावा प्रलंबित असताना झालेले फेरबदल मे.न्यायालयाचे निर्दशनास आणून त्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन ज्या कारणाकरिता दावा दाखल केलेला आहे त्याचा निर्णय देतेवेळी अथवा अंमलबजावणी करतेवेळी कोणतीही तांत्रिक अडचण उपस्थित होउ नये म्हणून वादीने प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे.

३. वादीचे अर्जास प्रतिवादींनी हरकत घेतली आहे.

४. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा साठेकराराची विशेष पूर्तता करुन मिळणेकरिता, प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेकरिता दिला आहे. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे मूळ स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. प्रतिवादी त्याबाबतची जादा कैफियत देउन सदरचा मुद्दा उपस्थित करु शकतात. प्रस्तावित दुरुस्ती मंजूर न केल्यास वादीचे वादाचे अंतिम निराकरण होणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीने प्रतिवादींचे बचावात देखील कोणताही बदल होणारा नाही. उलटपक्षी, प्रतिवादींना तशी संधी चौकशीचे वेळी प्राप्त होणार

आहे. तसेच, सदर दाव्याचा अंतीम निकाल दाव्यामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचे गुणदोषावर निराकरण होणे, तसेच पुढे भविष्यात याच कारणांसाठी पुन्हा नवीन दावे दाखल होउ नयेत याकरीता सदर अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे.

६. वरील सर्व कारणांचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने त्वरीत प्रस्तावित दावा दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

**दि.१९.०९.२०१७**

**(यशश्री मारुलकर)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खालापूर.**